**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**

कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,

पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३

dcptfc-pcpc@mah.gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/४५२६४९७ /२०२६ पिंपरी-चिंचवड दिनांक-२७/०५/२०२६

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

आंबेठाण मधील सा.क्र.४/४७० ते ४/५७० (लांबी १०० मी) हा भाग बांधकाम कालावधीत Descoped करण्यात आलेला होता.सद्यस्थितीत आंबेठाण हनुमान मंदिराचे मागील रस्त्यावर वासुली फाटा ते बिरदवाडी फाटा दरम्यान मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले असुन वाहतूक कोंडी तसेच अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.तसेच स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झालेल्या असल्याने सदर रस्त्यावरील खड्डे कॉंक्रेटीकरण करणेकरीता वाहतुक वळविणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी संदिप आटोळे, पोलीस उपायुक्त, परि-१ अति.कार्यभार, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### महाळुंगे, चाकण वाहतुक विभाग अंतर्गत

- आंबेठाण हनुमान मंदिराचे मागील रस्त्यावर वासुली फाटा ते बिरदवाडी फाटा दरम्यान ये-जा करणारे सर्व प्रकारचे वाहनांचे वाहतुकीस मनाई करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :-** १.तळेगाव बाजुकडून येणारी वाहने -वासुली फाटा मार्ग एच.पी चौक मार्ग इच्छितस्थळी जातील

२.तळेगाव बाजूकडून येणारी वाहने -भारत पेट्रोंल पंप शेजारील चौक मार्ग महाळुंगे गाव वाय पॉईट मार्ग इच्छित स्थिळी जातील

३.तळेगाव बाजूकडून येणारी वाहने -आंबेगाव ते महाळुंगे गाव वाय पॉईट मार्ग इच्छितस्थळी जातील

४.चाकण/खेड बाजूकडून येणारी वाहने-बिरदवडी चौक मार्ग महाळुंगे गाव वाय पॉईट मार्ग इच्छित स्थिळी जातील

५.चाकण/खेड बाजूकडून येणारी वाहने-बिरदवडी चौक मार्ग वाघजाई चौक मार्ग इच्छित स्थळी जातील

- पुणे नाशिक महामार्गावरील भाम फाटा व आंबेठाण चौक येथून बिरदवडी फाट्याकडे जाण्यास सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना मनाई करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग :- सदरची जड अवजड वाहने पुणे नाशिक महामार्गावरुन चाकण तळेगाव चौकमार्गे इच्छित स्थळी जातील.

तरी आंबेठाण मधील सा.क्र-४/४७० ते सा.क्र-४/५७० किमी (लांबी-१०० मी) या भागातील रस्ता दुरुस्तीकामासाठी वरील प्रमाणे दि. २८/०५/२०२६ रोजी २१.०० ते २९/०५/२०२६ रोजी २४.०० वाजे दरम्यान तात्पुरते स्वरुपात अधिसुचना (नोटीफिकेशन) निर्गमित करण्यात येत असून वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(संदिप आटोळे) २७/५/२६

पोलीस उपायुक्त,परि.१

अति,कार्य.वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

Scanned with OKEN Scanner

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **महाळुंगे, चाकण** वाहतुक विभाग,

२/- सदर वाहतुक बदलाचे अनुषंगाने ठेकेदार यांचेकडून योग्य त्या उपाययोजना करुनच वाहतुक वळविण्यात यावी.

Scanned with OKEN Scanner